दि. 20/09/2026

**प्रेसनोट**

## परभणी व हिंगोलीतील जुगार अड्डयांवर पोलीस उप महानिरीक्षक यांच्या पथकाच्या धाडी

### (45) इसमांविरुद्ध कारवाई, (23) लाखांचा मुद्देमाल जप्त

नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी आपल्याकडील पोलीस अधिकारी व अंमलदारांचे एक पथक परभणी व हिंगोली जिल्ह्यात रवाना केले होते.

सदर पथकाने, दिनांक 19/09/2026 रोजी जिंतूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत, मौजे भिलज येथील गजानन ज्ञानदेव गित्ते यांच्या मालकीच्या पत्र्याचे शेडमध्ये छापा टाकला असता, सदर ठिकाणी उपस्थित असणारे लोक, पैसे लावून पपलू नावाचा जुगार खेळत असल्याचे निदर्शनास आले. सदर ठिकाणावरील उपलब्ध कागदपत्रांची पडताळणी केली असता, सदर ठिकाणी दोस्ती मित्र मंडळ चॅरिटेबल ट्रस्ट, जिल्हा ठाणे यांचे लायसेन्सचे नावाखाली पपलू नावाचा जुगार खेळला जात असल्याचे व तो गजानन ज्ञानदेव गित्ते यांचे मार्फत बेकायदेशीर रित्या खेळविला जात असल्याचे पथकास आढळून आले.

सदर कारवाईत पोलीसांनी, (38) इमसांविरुध्द कारवाई करुन, त्यांच्याकडून 1,02,410/- रुपयांची रोकड, (33) मोबाईल, (1) चारचाकी वाहन व (10) मोटार सायकली असा एकूण 13,87,810/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याबाबत, जिंतूर पोलीस ठाणे येथे गु. र.न. 550/2026 कलम 4, 5, 12 (अ) महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

तद्नंतर, पथकाने वसमत शहर पोलीस ठाणे हद्दीत, भट्टी गल्लीतील जुगार खेळणाऱ्यांकडे आपला मोर्चा वळविला. सदर ठिकाणी संबंधितांविरुद्ध कारवाई करत, 70,260/-रुपयांची रोकड, (11) मोबाईल व (11) मोटार सायकली असा एकूण 9,64,260/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, नमूद प्रकरणात एकूण (7) इसमांविरुध्द कारवाई करुन, त्यांचेविरुध्द वसमत शहर पोलीस ठाणे येथे गुरनं 587/2026 कलम 12 (अ) महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा नोंदवला आहे.

उपरोक्त दोन्हीही कारवायांत, पथकाने एकूण (45) इसमांकडून 1,72,670/- रुपयांची रोकड, (44) मोबाईल, (1) चारचाकी वाहन व (21) मोटार सायकली असा एकूण 23,52,070/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ/ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ/ गणेश राठोड, पोहेकॉ/ प्रमोद जाधव, पोहेकॉ/ संदिप वाघाडे व पोहेकॉ/ गजानन डवरे यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन करून त्यांना प्रोत्साहित केले आहे.

**' खबर ' हेल्पलाइन वरुन माहिती द्या :** अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलीसांना पोहोचविता यावी, या दृष्टिकोनातून, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने 91 50 100 100 हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, सदर हेल्पलाइन वरून नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयापर्यंत पोहचवावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी केले आहे.

पोलीस उप महानिरीक्षक कार्यालय,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड